डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ व सलंग्न संस्थेतील असुधारीत वेतन संरचनेतील अधिकारी कर्मचा-यांना दि.१ जुलै,२०२१ ते दि. ३० सप्टेंबर,२०२१ या कालावधीत अनुज्ञेय महागाई भत्ता वाढीची थकबाकी मंजूर करण्याबाबत.

# डॉ .पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

## अर्थ प्रशासन विभाग

---

वाचा : १) या विभागाचे आदेश.क्र. मभवा/निमवा/२०२१-२२/११७२ ,दि.२२/१०/२०२१.
२) वित्त विभाग शासन निर्णय.क्र. मभवा-१३२१/ प्र.क्र.१४/सेवा-९, दि.३० मार्च, २०२२.
३) वित्त विभाग शासन निर्णय.क्र. निमवा-२०२१/ प्र.क्र.३५/ सेवा-४, दि. ३० मार्च, २०२२.

## आदेश

जा.क्र. अप्रवि/मभवा/निमवा/२०२२-२३/१३. दि.०६/०४/ २०२२.

उपरोक्त आदेश क्र. १ नुसार दि.२२/१०/२०२१ अन्वये असुधारीत संरचनेत वेतन व निवृत्ती वेतन / कुटूंब निवृत्ती वेतन ( ६ व्या वेतन आयोगानुसार) रकमेवर २५ % दराने महागाई भत्ता वाढ मंजूर केली आहे म्हणजेच त्यावेळच्या १६४% महागाई भत्त्या ऐवजी वेतन व निवृत्ती वेतनाच्या / कुटूंब निवृत्ती वेतनाच्या १८९% महागाई भत्ता वाढ मंजूर केली आहे.

शासन निर्णयाच्या अनुषंगाने विद्यापीठातील व विद्यापीठाशी संलग्न अनुदानित संस्थेतील असुधारीत वेतन व निवृत्ती वेतन / कुटूंब निवृत्ती वेतन संरचनेतील अधिकारी / कर्मचा-यांना व निवृत्ती वेतन/ कुटूंब निवृत्तीवेतन धारकांना सदर महागाई भत्त्याची वाढ दि. १ ऑक्टोंबर, २०२१ पासून लागू करण्यात आलेली आहे. आता संदर्भ २ व ३ शासन **निर्णयान्वये १ जुलै,२०२१ ते ३० सप्टेंबर,२०२१ या तीन महिन्यांच्या कालावधीतील अनुज्ञेय महागाई भत्त्याच्या थकबाकीची रक्कम माहे मार्च,२०२२ च्या वेतन व निवृत्ती वेतन/ कुटूंब निवृत्तीवेतना सोबत रोखीने देण्यात यावी.**

सदहू महागाई भत्त्याची थकबाकी माहे मार्च,२०२२ देय एप्रिल,२०२२ चे नियमित वेतन व निवृत्ती वेतन/ कुटूंब निवृत्तीवेतन देयकात रोखीने अदा करावी किंवा त्या पुढील नियमित मासिक वेतन देयकात समावेश करावा मात्र याबाबत पुरवणी देयक सादर करु नये अशी पुरवणी देयके पारीत केली जाणार नाहीत. महागाई भत्ता वाढीच्या थकबाकी अनुषंगाने होणारा वाढीव खर्च हा सन २०२२-२३चे मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

भा.कृ.अ.प. योजनांतर्गत सन २०२२-२३ करीता वेतन अनुदानाची मागणी करतांना संबंधीत कार्यान्वयन अधिका-यांनी प्रस्तुत महागाई भत्ता थकबाकी विचारात घेऊन त्यानुसार वेतन अनुदानाची मागणी करावी. द्वितीय सहामाही करीता अनुदानाची मागणी यापुर्वी केलेली असल्यास महागाई भत्त्याच्या थकबाकी तरतुदीसाठी स्वतंत्र वाढीव मागणी प्रस्ताव सबंधित कार्यान्वयन अधिका-यांनी भा.कृ.अ.प.स त्वरीत सादर करावा.

नियंत्रक
डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ
अकोला

पुढील पानांवर........

R.RAJU Bud

प्रति: १) नियंत्रण अधिकारी (सर्व) / आहरण व संवितरण अधिकारी (सर्व) / विभागप्रमुख(सर्व).डॉ.पं.दे.कृ.वि.. अकोला.

-----------------------------------------------------------------------

२) प्राचार्य________________________________________________.

३) अधिदान व लेखा अधिकारी, डॉ.पं.दे.कृ.वि., अकोला/ नागपूर.

यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीकरीता अग्रेषित.

निवृत्ती वेतन / कुटूंब निवृत्ती वेतन धारकांना वरील कालावधीची महागाई भत्ता थकबाकी रक्कम रोखीने माहे मार्च,२०२२ देय एप्रिल,२०२२ चे नियमित मासिक वेतन / निवृत्ती वेतन देयकात प्रदान करण्यात यावी. महागाई भत्ता अदा करण्यासाठी निवृत्ती वेतन अथवा वेतनाचे स्वतंत्र पुरवणी देयके आपण पारीत करु नये.

नियंत्रक

R.RAJU Bud